N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भाग्य नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0590 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/11/2024 02:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 22/11/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2024
**Time From (वेळेपासून):** 14:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/11/2024 **Time (वेळ):** 02:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/11/2024 02:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बिरसा मूंडा चौक, छत्रपती चौका ,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): उत्तम गंगाधरराव कुंटुरकर

(b) Father's Name (वडील चे नाव) : गंगाधरराव

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1963

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फरांदे नगर, युनियन बंकेच्या ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फरांदे नगर, युनियन बंकेच्या ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9921964267

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवराज विश्वनाथ बामणे | | वडील का नाम : विश्वनाथ | 1. हरि ओम नगर, नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | यादव मसनाजी सुर्यवंशी | | वडील का नाम : मसनाज | 1. एमजीएम कॉलेज समोर, नांदेड , भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | चंपत आनंदराव वाडेकर | | वडील का नाम : आनंदराव | 1. ओंकारेश्वर नगर, नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 दराचे 7500 नोटा व 100 रु दराचे 2500 | 4,000,000.00 |

**Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000,000.00

**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 23/11/2024

प्रथम खबर

मी उत्तम गंगाधरराव कुंटुरकर, वय 61 वर्षे, रा. घर नं. 38, फरांदे नगर, युनियन बॅकेच्या पाठीमागे, नांदेड, मो. नंबर-9921964267, आधार नंबर- 2504 2121 1772.
समक्ष पो.स्टे. भाग्यनगर, जि. नांदेड येथे हजर येवून प्रथम खबर देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून माझी कुंटुरकर एज्युकेशन सोसायटी नांदेड या नावाची संस्था असून त्या संस्थेचा मी अध्यक्ष आहे. नमुद संस्थेची संचलित कुंटुरकर निवासी दिव्यांग कार्यशाळा, राज कॉर्नर, नांदेड ही सन 1996 मध्ये सुरू केलेली आहे.
माझे दिव्यांग कार्यशाळेत कार्यरत असलेले माझी सुन 1) श्रीमती आरती राजेश भुरेवार, गृहपाल, 2) श्री. शुभम दिलीप बिजमवार, व्यवस्थापकीय अधीक्षक, 3) श्री.तिरूपती भीमराव गोदगे, काळजीवाहक, 4) श्री. अजय चिमनाजी कांबळे, स्वयंपाकी व 5) श्री. इरफान अली युनुस अली, काळजीवाहक यांचे सन 2014 ते 2023 या कालावधीतील प्रलंबीत वेतन व भत्ते आणि कार्यशाळेतील 6) प्रभारी मुख्याध्यापक सुभाश खंडागळे यांच्या 7 व्या वेतनाचा फरक हे शासनाकडून मंजुर झालेले असुन त्याचा मंजुरी आदेश क्र. दिकआ/तरतुद वाटप/अ.शा. स्था/थकित वेतन/2024-25/ पुणे, दिनांक 24/10/2024 असा आहे. नमुद प्रलंबीत वेतनाची थकित रक्कम सुमारे 1,41,48,013/-रूपये एवढी आहे.
नमुद थकित वेतनाची रक्कम समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड येथील जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. सत्येंद्र आऊलवार यांचेकडे अदा करण्यासाठी आलेली होती.
मला दिनांक 24/10/2024 रोजी श्री. यादव सुर्यवंशी, मुख्याध्यापक यांचा त्यांचे मोबाईल क्रमांक 8208103551 वरून माझे मोबाईल क्रमांक 9921964267 वर फोन आला व त्यांनी नमुद थकित वेतनाच्या संदर्भाने मला बोलले होते. व त्यानंतर मला दिनांक 04/11/2024 रोजी छत्रपती चौक नांदेड येथे त्यांनी भेटायला बोलावले होते.
मी दिनांक 04/11/2024 रोजी छत्रपती चौक नांदेड येथे जावून श्री. यादव सुर्यवंशी यांना भेटलो. तेव्हा त्यांचेसोबत श्री. शिवराज बामणे, लिपिक हे सुध्दा हजर होते. नमुद वेळी त्या दोघांनी मला सांगितले की, तुमच्या कार्यशाळेतील कर्मचार्यांचे प्रलंबीत वेतन 1,41,48,013/- एवढे मंजूर झाले आहे. त्यातील सुमारे साडे पाच लाख रूपये फरकाचे बिल सुभाष खंडागळे यांचे आहे. सुभाष खंडागळे यांचे सोडून इतरांचे प्रलंबीत वेतन 1.36 कोटीचे बिल अदा करण्यासाठी मंजुर रक्कमेच्या 50 टक्के रक्कम जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. सत्येंद्र आऊलवार साहेबांना दयावी लागेल. नमुद रक्कम दिली नाही तर मंजूर झालेले थकित वेतनाचे बील शासनाला ते परत पाठविणार आहेत. त्यांनी असे म्हणाल्याने मी त्यांना 50 टक्के रक्कम जास्त होत आहे. त्यामुळे द्यावयाची रक्कम कमी करण्याची विनंती केली. त्यांनी सांगितले की, आम्ही आऊलवार साहेबांना विचारून उदया सांगतो असे म्हणून ते निघून गेले होते.
श्री यादव सुर्यवंशी व श्री शिवराज बामने यांनी दिनांक 05/11/2024 रोजी मला नमस्कार चौक नांदेड येथे बोलावून घेतले. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुमच्या कार्यशाळेतील कर्मचार्यांचे थकित वेतन अंदाजे 1.36



Scanned with CamScanner

कोटी रूपये अदा करण्यासाठी मंजूर रक्कमेच्या 40टक्के रक्कम दयावी लागेल असे श्री. आऊलवार साहेबांनी आम्हाला सांगितले आहे. सदर रक्कम दिली तरच बिलामध्ये त्रुटी काढणार नाही. अन्यथा मंजूर रक्कम आम्ही परत पाठवून देतो असे म्हणाले, त्यामुळे त्यांनी मागितलेली रक्कम दिली नाही तर ते माझे कार्यशाळेतील कर्मचार्यांचे थकित वेतनाचे बिल अदा करणार नाहीत. ज्यामध्ये माझी सुन आरती भुरेवार हीचे पण बिल होते. म्हणून मी त्यांना नाईलाजाने होकार दिला आहे.

त्यानंतर माझे कार्यशाळेतील लिपिक श्री. वाडेकर यांनी मला फोनद्वारे कळविले की, त्यांना श्री. बामणे व श्री. सुर्यवंषी यांचा फोन आल्याचे सांगुन त्यांनी सदर कामासाठी 50 टक्के मागत असल्याचे सांगितले व मी आल्यावर काहीतरी कमी करूत असे सांगितले होते.

परंतु श्री बामणे व श्री सुर्यवंशी यांनी मागितलेली रक्कम 40 टक्के प्रमाणे सुमारे 54 लाख रूपये होत आहेत. सदर रक्कमेची उभारणी करण्यास वेळ लागु शकतो. त्यामुळे मला वेळ देण्यात यावा अशी मी त्यांना विनंती केली असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे कार्यशाळेतील कर्मचार्यांचे बँक खात्यावर थकित वेतनाची रक्कम जमा झाल्यावर लगेच आम्हाला 54 लाख रूपये रक्कम आणून दया असे सांगितले आहे. परंतू ते माझेकडे मागत असलेली रक्कम लाच असल्याची मला खात्री झाली आहे व त्यांना लाच देण्याची माझी ईच्छा नसल्याने मी आमच्या कार्यशाळेतील कर्मचा-यांचे प्राधिकारपत्र घेवून त्यांच्या वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दि. 13/11/2024 रोजी तक्रार दिली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी लाच मागणी बाबतची पडताळणी करण्यासाठी मला शासकीय पंचासह दि. 13/11/2024 रोजी लिपिक श्री बामणे यांची मोर चौकात भेट घेण्यासाठी पाठविले. लिपिक बामणे हे मोटार सायकल क्रमांक एमएच 26 एएल 8329 वर आले. मी लिपिक बामणे यांना त्यांचे बिलाबाबत विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी बिल उदया पडून जाईल, मी ट्रेझरी ऑफीसला उदया स्वतः जातो व उदया संध्याकाळ पर्यंत बिलाची रक्कम बँक खात्यात जमा करून टाकतो. ठरल्याप्रमाणे कमिशनचेवर आणखीन 6, 7 लाख रूपये वाढायलेत, त्याबद्दल आऊलवार साहेबांना बोलून विनंती करा की, ते काही कमी करा किंवा त्यासाठी थोडा वेळ द्या अशी विनंती करा असे तक्रारदार म्हणाले असता, लिपीक बामणे यांनी ''तुम्ही काळजी करू नका, आपण दोघे जावून साहेबांना भेटू व विनंती करू जे काही कमी होईल किंवा हिशोबा प्रमाणे जेवढे पैसे होतील ते बघू असे सांगितले. तुम्ही पैसे सुर्यवंशी कडे द्या, किंवा वाडेकर कडे द्या किंवा मला आणून द्या'' असे म्हणाले. त्यानंतर दि. 14/11/2024 रोजी संध्याकाळी उशीराने माझे दिव्यांग कार्यशाळेतील कर्मचा-यांचे बँक खात्यावर त्यांचे वेतनाचे थकीत बिल जमा झाले. त्यानंतर दि. 15/11/2024 रोजी लिपिक वाडेकर यांना कॉल केला व तुम्ही इरफानला काही बोलले का असे विचारले असता, त्यांनी काही नाही बोललो, तेव्हा मी त्यांना इरफान पैसे देत नाही म्हणत आहे असे म्हणालो, त्यावेळी लिपिक वाडेकर यांनी कसे देत नाही, ठरल्याप्रमाणे त्याला पैसे द्यावेच लागतील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना शुभमचे ? असे विचारले असता, लिपिक वाडेकर यांनी शुभमचं आपले जे ठरले ते करूत, तुम्ही म्हणले होते ना, चाळीस तिकडून, इकडून दहा म्हणले होते ना, जावूता, करूता उदया आता पाहून घेवूत, तीन दिवस सुट्टयाच आहेत ना, पैशे कुठले राहणार आहेत, आता इलेक्शनमुळे. तेव्हा मी त्यांना बामणे मला काय म्हणला होता, पैशे सुर्यवंशी कडे द्या, किंवा तुमच्याकडे द्या किंवा मला आणून द्या, आपण आऊलवार साहेबाकडे जावूत, आणि हे सगळे पैसे जमा करून दोघ, तिघं मिळून जावून देवून टाकून देवूत असे म्हणाले होते असे सांगितले असता, लिपिक वाडेकर याने हो, चालते, चालते असे म्हणाले.

त्यानंतर दि. 17/11/2024 रोजी लोकसेवक यादव सुर्यवंशी याने मला छत्रपती चौकात बोलावून घेतले, तेव्हा मी व पंच मोबीन खान असे छत्रपती चौकात गेलो, तेव्हा मला लोकसेवक यादव सुर्यवंशी यांचा फोन आला व त्यांनी शिवमंदिर चैतन्यनगर येथे भेटण्यास बोलविले. त्यामुळे आम्ही शिवमंदिर चैतन्यनगर येथे गेलो. तेथे लोकसेवक यादव सुर्यवंशी यांनी मला ठरल्याप्रमाणे 54 लाख रूपये होतात. आपण ते साहेबांकडे घेवुन जावुत व तेथे आजुन काही कमी करा अशी साहेबांना विनंती करू असे म्हणून लाचेची मागणी केली.

त्यानंतर दि. 18/11/2024 रोजी सकाळी अकरा वाजण्याचे सुमारास श्री. वाडेकर, श्री बामणे, श्री. सुर्यवंशी असे मला भेटायला माझे घराकडे आले. त्यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान त्यांनी माझे कार्यशाळेतील कर्मचायांचे प्रलंबित बिलाचे अनुषंगाने ठरल्याप्रमाणे पैशाची मागणी केली. त्यावर मी त्यांना म्हणालो की, पैशाची जाडजोड चालु आहे. जाडजोड झाल्यावर चार वाजेपर्यंत सांगतो असे म्हणालो असता, त्यांनी सांगितले की, पैशाची जाडजोड झाल्यानंतर पैसे वाडेकर यांचेकडे दया असे म्हणुन ते तिघेही तेथुन निघुन गेले.

दि. 18/11/2024 रोजी वेळ 18.12 वाजता मी माझे मोबाईल नंबर 9921964267 वरून लोकसेवक वाडेकर यांचा मोबाईल नंबर 8275238657 वर स्पीकर ऑन करून फोन केला. लोकसेवक वाडेकर यांनी फोन रिसीव्ह करून बोला की सर असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना म्हणालो की, काही नाही कस करायच, त्यावर लोकसेवक

Scanned with CamScanner

कोटी रूपये अदा करण्यासाठी मंजूर रक्कमेच्या 40टक्के रक्कम दयावी लागेल असे श्री. आऊलवार साहेबांनी आम्हाला सांगितले आहे. सदर रक्कम दिली तरच बिलामध्ये त्रुटी काढणार नाही. अन्यथा मंजूर रक्कम आम्ही परत पाठवून देतो असे म्हणाले, त्यामुळे त्यांनी मागितलेली रक्कम दिली नाही तर ते माझे कार्यशाळेतील कर्मचार्यांचे थकित वेतनाचे बिल अदा करणार नाहीत. ज्यामध्ये माझी सुन आरती भुरेवार हीचे पण बिल होते. म्हणून मी त्यांना नाईलाजाने होकार दिला आहे.

त्यानंतर माझे कार्यशाळेतील लिपिक श्री. वाडेकर यांनी मला फोनद्वारे कळविले की, त्यांना श्री. बामणे व श्री. सुर्यवंषी यांचा फोन आल्याचे सांगुन त्यांनी सदर कामासाठी 50 टक्के मागत असल्याचे सांगितले व मी आल्यावर काहीतरी कमी करूत असे सांगितले होते.

परंतु श्री बामणे व श्री सुर्यवंशी यांनी मागितलेली रक्कम 40 टक्के प्रमाणे सुमारे 54 लाख रूपये होत आहेत. सदर रक्कमेची उभारणी करण्यास वेळ लागु शकतो. त्यामुळे मला वेळ देण्यात यावा अशी मी त्यांना विनंती केली असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे कार्यशाळेतील कर्मचार्यांचे बँक खात्यावर थकित वेतनाची रक्कम जमा झाल्यावर लगेच आम्हाला 54 लाख रूपये रक्कम आणून दया असे सांगितले आहे. परंतू ते माझेकडे मागत असलेली रक्कम लाच असल्याची मला खात्री झाली आहे व त्यांना लाच देण्याची माझी ईच्छा नसल्याने मी आमच्या कार्यशाळेतील कर्मचा-यांचे प्राधिकारपत्र घेवून त्यांच्या वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दि. 13/11/2024 रोजी तक्रार दिली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी लाच मागणी बाबतची पडताळणी करण्यासाठी मला शासकीय पंचासह दि. 13/11/2024 रोजी लिपिक श्री बामणे यांची मोर चौकात भेट घेण्यासाठी पाठविले. लिपिक बामणे हे मोटार सायकल क्रमांक एमएच 26 एएल 8329 वर आले. मी लिपिक बामणे यांना त्यांचे बिलाबाबत विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी बिल उदया पडून जाईल, मी ट्रेझरी ऑफीसला उदया स्वतः जातो व उदया संध्याकाळ पर्यंत बिलाची रक्कम बँक खात्यात जमा करून टाकतो. ठरल्याप्रमाणे कमिशनचेवर आणखीन 6, 7 लाख रूपये वाढायलेत, त्याबद्दल आऊलवार साहेबांना बोलून विनंती करा की, ते काही कमी करा किंवा त्यासाठी थोडा वेळ द्या अशी विनंती करा असे तक्रारदार म्हणाले असता, लिपीक बामणे यांनी ''तुम्ही काळजी करू नका, आपण दोघे जावून साहेबांना भेटू व विनंती करू जे काही कमी होईल किंवा हिशोबा प्रमाणे जेवढे पैसे होतील ते बघू असे सांगितले. तुम्ही पैसे सुर्यवंशी कडे द्या, किंवा वाडेकर कडे द्या किंवा मला आणून द्या'' असे म्हणाले. त्यानंतर दि. 14/11/2024 रोजी सध्याकाळी उशीराने माझे दिव्यांग कार्यशाळेतील कर्मचा-यांचे बँक खात्यावर त्यांचे वेतनाचे थकीत बिल जमा झाले. त्यानंतर दि. 15/11/2024 रोजी लिपिक वाडेकर यांना कॉल केला व तुम्ही इरफानला काही बोलले का असे विचारले असता, त्यांनी काही नाही बोललो, तेव्हा मी त्यांना इरफान पैसे देत नाही म्हणत आहे असे म्हणालो, त्यावेळी लिपिक वाडेकर यांनी कसे देत नाही, ठरल्याप्रमाणे त्याला पैसे द्यावेच लागतील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना शुभमचे ? असे विचारले असता, लिपिक वाडेकर यांनी शुभमचं आपले जे ठरले ते करूत, तुम्ही म्हणले होते ना, चाळीस तिकडून, इकडून दहा म्हणले होते ना, जावूता, करूता उदया आता पाहून घेवूत, तीन दिवस सुट्टयाच आहेत ना, पैशे कुठले राहणार आहेत, आता इलेक्शनमुळे. तेव्हा मी त्यांना बामणे मला काय म्हणला होता, पैशे सुर्यवंशी कडे द्या, किंवा तुमच्याकडे द्या किंवा मला आणून द्या, आपण आऊलवार साहेबाकडे जावूत, आणि हे सगळे पैसे जमा करून दोघ, तिघं मिळून जावून देवून टाकून देवूत असे म्हणाले होते असे सांगितले असता, लिपिक वाडेकर याने हो, चालते, चालते असे म्हणाले.

त्यानंतर दि. 17/11/2024 रोजी लोकसेवक यादव सुर्यवंशी याने मला छत्रपती चौकात बोलावून घेतले, तेव्हा मी व पंच मोबीन खान असे छत्रपती चौकात गेलो, तेव्हा मला लोकसेवक यादव सुर्यवंशी यांचा फोन आला व त्यांनी शिवमंदिर चैतन्यनगर येथे भेटण्यास बोलविले. त्यामुळे आम्ही शिवमंदिर चैतन्यनगर येथे गेलो. तेथे लोकसेवक यादव सुर्यवंशी यांनी मला ठरल्याप्रमाणे 54 लाख रूपये होतात. आपण ते साहेबांकडे घेवुन जावुत व तेथे आजुन काही कमी करा अशी साहेबांना विनंती करू असे म्हणून लाचेची मागणी केली.

त्यानंतर दि. 18/11/2024 रोजी सकाळी अकरा वाजण्याचे सुमारास श्री. वाडेकर, श्री बामणे, श्री. सुर्यवंशी असे मला भेटायला माझे घराकडे आले. त्यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान त्यांनी माझे कार्यशाळेतील कर्मचायांचे प्रलंबित बिलाचे अनुषंगाने ठरल्याप्रमाणे पैशाची मागणी केली. त्यावर मी त्यांना म्हणालो की, पैशाची जाडजोड चालु आहे. जाडजोड झाल्यावर चार वाजेपर्यंत सांगतो असे म्हणालो असता, त्यांनी सांगितले की, पैशाची जाडजोड झाल्यानंतर पैसे वाडेकर यांचेकडे दया असे म्हणुन ते तिघेही तेथुन निघुन गेले.

दि. 18/11/2024 रोजी वेळ 18.12 वाजता मी माझे मोबाईल नंबर 9921964267 वरून लोकसेवक वाडेकर यांचा मोबाईल नंबर 8275238657 वर स्पीकर ऑन करून फोन केला. लोकसेवक वाडेकर यांनी फोन रिसीव्ह करून बोला की सर असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना म्हणालो की, काही नाही कस करायच, त्यावर लोकसेवक



Scanned with CamScanner

वाडेकर यांनी मला म्हणाले की, शुभमला बोलल्या नाही का ? तेव्हा मी त्यांना सांगितले की, बोललो तो माझ्या अकाऊटंला आर.टी.जी.एस. करणार आहे. त्यावर लोकसेवक वाडेकर यांनी बर ठिक आहे, बघुत नंतर मग असे म्हणाल्याने मी त्यांना उदया डयुटी आहे का तुमची ? अशी विचारणा केली. तेव्हा लोकसेवक वाडेकर यांनी माझे विचारण्यावरून सांगितले की, माझी, बामणे, सुर्यवंशी व आउलवार साहेब सगळ्यांची इलेक्शन डयुटी आहे. आता इलेक्शन झाल्यावरच काम होईल असे म्हणून फोन कट केला.
त्यानंतर दि. 22/11/2024 रोजी मला यादव सुर्यवंशी यांचा कॉल आला व त्यांनी मला शुभमच्या आरटीजीएस चे काय झाले करून टाका म्हणाव की लवकर असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना शुभम माझे मुलाचे अकाउन्टला आरटीजीएस करणार आहे. त्याने आरटीजीएस केले की, मी लगेच कॅश काढून तुम्हाला आणून देतो असे म्हणालो. त्यानंतर परत मला यादव सुर्यवंशी यांचा फोन आला व त्यांनी आम्ही तिघे बिरसा मुंडा चौकात आलो आहे. तुम्ही या असे म्हणून मला बिरसा मुंडा चौकात बोलावून घेतले. मी व पंच भोसले तेथे गेलो, तेव्हा त्याठिकाणी लिपिक बामणे, लिपिक वाडेकर व मुख्याध्यापक यादव सुर्यवंशी असे तिघेजण होते. ते मला म्हणाले की, शुभमला डायरेक्ट आम्ही दिलेल्या अकाउंटवर आरटीजीएस करायला लावा. कशाला कुटाणे करता, इलेक्शनचे दिवस आहेत, इतकी कॅश मिळत नाही बँकेतून असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना माझा मुलाचे दोन करोडचे सीसी मंजूर होणार आहे. त्यासाठी त्याचे अकाउन्टवर शुभमला आरटीजीएस करायला सांगितले आहे. माझा मुलगा गोल्ड लोनचा मॅनेजर आहे, त्याचे अकाउन्टला पैसे येताच तो लगेच कॅश काढून आणून मला देणार आहे. मी तुम्हाला कॅश आणून देतो तुम्ही काळजी करू नका असे म्हणालो. तेव्हा यादव सुर्यवंशी याने मी मौतीला चाललो, तुम्ही पैसाची जाडजोड लावून आणून बामणे आणि वाडेकर कडे दया असे म्हणाले.
त्यानंतर दि. 22/11/2024 रोजी परत दोन वेळेस लिपिक बामणे यांचे माझे मोबाईलवर दोन कॉल आले व त्यांनी मला लवकर या आम्ही बिरसा मुंडा चौकात थांबलो आहे असे म्हणाले. त्यानंतर मी 14.37 वाजता लाचलुचलपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथून पंच भोसले यांच्यासह माझेकडे उपलब्ध झालेले 40,00,000/- रूपये नगदी लाचेचे पैसे एका क्रिम रंगाचे पिशवीत घेवून माझे मोटार सायकलने निघालो. मला परत लिपिक बामणे यांचा माझे मोबाईलवर कॉल आला व त्यांनी लवकर या आम्ही बिरसा मुंडा चौकात थांबून आहोत असे म्हणाले. त्यानंतर मी व माझेसोबत पंच भोसले आम्ही बिरसा मुंडा चौकात गेलो असता, त्याठिकाणी लिपिक बामणे व लिपिक वाडेकर हे दोघे होते. त्यानंतर आम्ही बाजूलाच असलेल्या हॉटेल मध्ये जावून चहा घेतला. तेव्हा बामणे यांनी मला इशा-याने पैसे आणले का असे विचारले, तेव्हा मी त्यांना माझेकडील पैश्याची बॅग दाखवून बामणेकडे दिली. बामणे यांनी पैश्याची बॅग घेवून उघडून पाहिली व परत बॅग माझेकडे दिली. त्यानंतर मला त्याचे मोटारसायकलवर बसण्यास ईशारा करून मला बसा की, असे म्हणाला. बामणे व वाडेकर हे मला कुठे घेवून जातील हे माहित नसल्याने व त्यांनी लाचेची रक्कम स्विकारून मला मोटारसायकलवर सोबत घेवून जात असल्याने मी सापळा पथकास लाच स्विकृतीचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री बोडके साहेब व त्यांचे पथकाने लाचेच्या रक्कमेसह लिपिक बामणे व लिपिक वाडेकर यांना ताब्यात घेतले.
तरी मला माझे दिव्यांग कार्यशाळेत कार्यरत असलेले कर्मचा-यांचे प्रलंबीत वेतन व भत्ते आणि 7 व्या वेतनाचा फरक हे शासनाकडून मंजुर झालेले बिल अदा केलेल्या कामाचा मोबदला म्हणून 1) शिवराज विश्वनाथ बामणे, पद - लिपिक, नेम. छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय, काबरा नगर, नांदेड, रा. हरि ओम नगर, नांदेड. 2) यादव मसनाजी सुर्यवंशी, पद मुख्याध्यापक, नेम. वैभव निवासी शाळा, खानापुर, ता. देगलूर, जि. नांदेड, रा. एमजीएम कॉलेज समोर, नांदेड. 3) चंपत आनंदराव वाडेकर, पद लिपिक, नेम. कुटूंरकर निवासी दिव्यांग कार्यशाळा, राज कॉर्नर, नांदेड, रा. ओंकारेश्वर नगर, नांदेड यांनी वरिष्ट अधिकारी आउलवार यांचे पदाचा प्रभाव टाकून त्यांचेकरिता म्हणून स्वतःचे आर्थिक फायदयाकरिता कर्मचा-यांचे मंजूर बिलाचे रक्कमेपैकी 40 टक्क्याप्रमाणे 54,00,000/- रूपयाची पंचासमक्ष मागणी केली. त्यानंतर 1) शिवराज विश्वनाथ बामणे, 2) चंपत आनंदराव वाडेकर यांनी 40,00,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी वरील तिघांविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यास कायदेशीर प्रथम खबर आहे.

समक्ष पंच सहया तक्रारदार यांचे नाव व स्वाक्षरी

उत्तम गंगाधरराव कुंटुरकर
पंच क्र. 1) ........................ रा. फरांदेनगर, नांदेड
मो.नं. 9921964267



Scanned with CamScanner

पंच क्र. 2) ........................

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RAMDASH BABURAO SHEDGE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAMDASH BABURA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner

पंच क्र. 2) ........................

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः याब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAMDASH BABURAO SHEDGE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in Charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAMDASH BABURA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with CamScanner